
# सुस्वागतम्





# No Transfusion of Idea Only transformation


स्वामी चिन्मयानंदांचे शैक्षणिक विचार

राज्यस्तरीय चर्चासत्र

दि. ३–४–५ मार्च २०११


धर्मसंकल्पना व हिंदू धर्म :–:–





“धर्म हा संस्कृत शब्द आहे. ह्याला इंग्रजीत पर्यायी शब्द नाही. कुणी ह्याचे भाषांतर **Righteousness** असे करतात. पण ह्यातून धर्माचा अर्थ अभिव्यक्त होत नाही.”






**"It includes all those fundamental values of life that are universally good in all places and at all times. It is the foundation of all efforts at moral rearmaments and ethical perfection encompasses the eternal duties of every person who want to give up to the full dignity of the human beings and strive consistently to grow in to his full stature as a God man in this very life translate Dharma as duty."**




# धर्म म्हणजे **Law of Being**




धर्म ह्याचा अर्थ नुसतेच सदाचरण किंवा चांगुलपणा नव्हे तर ज्याच्या शिवाय एखादी वस्तु आपले स्वतंत्र अस्तित्व टिकवून ठेवू शकत नाही. असा त्या वस्तुचा आवश्यक स्वभाव.






धर्म म्हणजे तिच्या अस्तित्वाचा नियम होय. कोणतीही वस्तु तिच्या धर्माशिवाय तिचे अस्तित्व टिकवून धरु शकत नाही आणि वस्तु आहे त्या स्वरुपामध्ये ज्याच्यामुळे राहू शकते तो त्या वस्तुचा धर्म होय.






धर्म व्यक्तिला आपली आंतरिक शक्ती शोधवयास मदत करतो वा ज्या योगे व्यक्ती आपल्या जीवनातील आव्हानांना सामोरे जाऊ शकेल. लोकांची सेवा करुन जीवन जगू शकेल. बाह्य जीवनात सर्वार्थाने विश्वासाने जीवन जगू शकणे हाच खरा धर्म होय.






जीवनाच्या पुनर्मूल्यांकनाचे विज्ञान म्हणजे धर्म आहे. वैज्ञानिकांनी केलेले प्रयोग हे प्रयोगशाळेतील असून ते बाह्य संसाराचे आहे पण प्राचीन ऋषींनी केलेले प्रयोग हे मानवाचे अनुभव व आंतरिक जग आहे. वैज्ञानिक जाणू इच्छितात जग म्हणजे काय व ऋषी जाणून असतात मानव म्हणजे काय.






धर्म व विज्ञान एकमेकांपासून वेगळे राहून समाजाला सुखी बनवू शकत नाही.






स्वधर्म म्हणजे एखाद्या जातीत जन्मल्यामुळे व्यक्तिच्या वाट्याला आलेले कर्म नव्हे. खऱ्या अर्थाने येथे व्यक्तिचा धर्म म्हणजे त्याच्या अंतःकरणात त्याला आढळून येणाऱ्या वासनांचा प्रकार होय. आपल्या स्वतःच्या मूळ वासना विरुध्द वागणे म्हणजे परधर्म.






आत्मतत्वाशिवाय मनुष्य अस्तित्वात राहू शकत नाही. तेच अस्तित्वाला आधार देते. म्हणून मनुष्याचा आवश्यक धर्म त्यांच्यातील अस्तित्वाचे दिव्य स्फुल्लिंग अनंत परमात्मा हा आहे.






मनवी धर्माबाबत मानसशास्त्रीय उपपत्ती






“ज्या वासना घेऊन एखादी व्यक्ती तिच्या चालू आयुष्यात जन्म घेते त्या वासनाच्या गाठोड्याला धर्म असे म्हणतात. प्रत्येक व्यक्तिने आपल्या सहज व जन्मजात प्रवृत्ती प्रमाणे कर्म करणे हाच शांती, सुख व समाधान यांनी जीवन जगण्याचा मार्ग आहे. हा स्वधर्म आहे व आपल्या स्वतच्या मूळवासनाच्या विरुध्द वागणे म्हणजे परधर्म होय.






जोपर्यंत व्यक्तिला स्वतःमधील दोन व्यक्तिमत्वाची जाणीव होत नाही तोपर्यंत कोणताही धर्म त्याच्यासाठी उपयोगाचा नाही. स्वतःमध्ये द्विधा व्यक्तिमत्व आहे असे जर एखाद्या व्यक्तिला आढळून येईल आणि स्वतःमधील उच्चस्तर भागाइतकाच निम्नस्तराचा भागही जर आपल्याला निष्कलंक राखायचा असेल तर ही महत्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठी त्याला जे साधन वापरावे लागेल त्याला धर्म म्हणतात.






मूळ वासना ह्या उदात्त असतात, व्यापक असतात. पण जसजशा त्या मानवाच्या शारीरिक, मानसिक, भावनिक पातळीशी एकरुप होतात त्यातून मानवाच्या हीन व्यक्तिमत्वाची निर्मिती होते पण निम्न व्यक्तिमत्वाचे बुध्दीशी ऐक्य घडवून आणल्यास निम्न व्यक्तिमत्वास शिस्त लागते व निम्न व्यक्तिमत्व हे उच्च व्यक्तिमत्वाच्या अधिपत्याखाली येते तेव्हा माणूस धर्माचे आचारण करावयास लागतो.






आपल्यातील दिव्यत्वाच्या प्रभावाखाली जेव्हा जेव्हा आपल्यातील हीनत्व येते तेव्हा तेव्हा आपल्यातील सैतानी वृत्ती बदलतात व हे दिव्यच आपला मित्र बनतो व ह्या ठिकाणे खऱ्या अर्थाने मानवाला आपल्या खऱ्या धर्माचा शोध लागतो.





जे जीवनाच्या स्थित्यंतरातून वाढत जाऊन मानसिक व बौध्दिक दृष्ट्या अधिक विकसित झाले आहेत. त्यांच्यापुढे ह्या सर्व गोष्टी कोठून व का आल्यात? त्या कोठे जातात? जीवनाला काही हेतू व उद्दिष्ट आहे का? का जीवन म्हणजे एक अपघात आहे? असे आव्हानात्मक प्रश्न उभे राहतात.






मानवी जीवन यशस्वी सार्थक बनविणारे तत्वज्ञान व ह्या तत्वज्ञानानुसार बनलेला आचार धर्म ह्याला गुरुदेवांनी धर्म म्हटले आहे.

चर्च, देवळे, मशिदी, धार्मिक संज्ञा, मिशन्स, मठ, आश्रम ह्यामधील रमणारी धर्म संकल्पना मान्य नाही


ह्या धर्म संकल्पना मानवा–मानवात फूट निर्माण करतात आणि म्हणूनच ते धर्माला एक संस्था मानत आणि जेव्हा ह्या संस्थेचे पंथात रुपांतर होते तेव्हा त्यातील सगळा चांगुलपणा विकृत होतो।






“या जगाच्या मैदानात जिथे उपनिषदांनी, ऋषींनी सांगितलेली सत्य तत्वे तंतोतंत पाळली जातात. त्यालाच या देशात धर्म म्हणतात”.






''या जगाच्या मैदानात जिथे उपनिषदांनी, ऋषींनी सांगितलेली सत्य तत्वे तंतोतंत पाळली जातात. त्यालाच या देशात धर्म म्हणतात''.





# हिंदु धर्म :–




# हिंदु धर्म :–

प.पू. गुरुदेवांनी हिंदुत्वाची संकल्पना ऋषीत्वाशी जोडली.




# हिंदु धर्म :–



की हिंदुत्वात अनेक धर्म आहेत. ह्या सर्व धर्माचा मिळून एकच धर्म बनला आहे आणि तो म्हणजे हिंदुत्व पण काळाच्या ओघात समाजाच्या मागणीनुसार एक एक धर्म ह्यातून वेगळा होत गेला.




# हिंदु धर्म :–



जेव्हा जेव्हा धर्म आणि त्याचे उद्दिष्ट ह्यांची सांगड घातली गेली तेव्हा तो मनव जातीला वरदानच ठरला.  ह्या उलट दुर्दैवाने जेव्हा तो धर्म संकुचित होऊन माझा धर्मगुरु माझा पवित्र ग्रंथ माझी धार्मिक कर्मे ह्या अट्टाहासात गुंतला तेव्हाच तो समाजात दुफळी माजविणारा व काही लोकांकरीता झाला त्याची व्यापकता नाश पावली






# हिंदु धर्म :–

आणि म्हणूनच धर्माला जर तत्वज्ञानाचा पाया नसेल तर तो धर्मभोळेपणा होईल आणि तत्वज्ञानाला धर्माचा आधार नसेल तर तो वेडगळपणा ठरेल. हिंदु धर्म हा मानव धर्मावर जास्त भर देतो




# हिंदु धर्म :–



धर्म वाढवायचा असेल तर धर्म संकल्पनेतील चूकांची मूल्ये उपटून काढायला हवी. पण आज परिस्थिती वेगळी आहे.  आज सध्याच्य आधुनिक जगात विज्ञान प्रगती करीत माणसातली माणूस काढून टाकीत आहे.




# हिंदु धर्म :–



जेव्हा जेव्हा धर्म आणि त्याचे उद्दिष्ट ह्यांची सांगड घातली गेली तेव्हा तो मनव जातीला वरदानच ठरला. ह्या उलट दुर्दैवाने जेव्हा तो धर्म संकुचित होऊन माझा धर्मगुरु माझा पवित्र ग्रंथ माझी धार्मिक कर्मे ह्या अट्टाहासात गुंतला तेव्हाच तो समाजात दुफळी माजविणारा व काही लोकांकरीता झाला त्याची व्यापकता नाश पावली






# हिंदु धर्म :–

हिंदु धर्म म्हणजे परिपूर्ण होण्याचे शास्त्र आहे. आज आपण आंधळेपणाने जो धर्म पाळतो आहोत तो खराखुरा प्रभावशाली हिंदु धर्म नव्हेच, खरा हिंदु धर्म उपनिषदातून सांगितलेला सनातन धर्म होय.




# हिंदु धर्म :–



हिंदुत्वातून जर दुष्ट व्यापारी, दुकानदार, निर्दयी सावकार, पैसे खाणारे कारकून, हृदयशुन्य मालक, अविश्वासू नोकर निर्माण करीत असेल तर अशा हिंदुत्वाचा ते निषेधही करतात. अर्थात ही वृत्ती हिंदुत्वाची नाही हे ह्या ठिकाणी स्पष्ट करतात.






## हिंदु धर्म :–

“हिंदू धर्म हा कर्तव्य व जबाबदारी ह्यावर आधारीत आहे. तो अधिकारावर आधारीत नाही.




# हिंदु धर्म :–



In contrast the western way of thought has molded it self upon the principle of right. Rights are to be taken to be acquired and to be preserved. A civilization based upon rights must necessarily come to fight. In such a society the Instincts of acquiring hoarding and maintaining ultimately upset peace. On the other hand a culture build upon duties recognizes the right to do one duty as a fundamental privilege in life. A generation that understands such culture gets trained to demand of life ample chances to fulfill its duties. Duty there fore develops the spirit of giving .

# हिंदु धर्म :–




In contrast the western way of thought has molded it self upon the principle of right. Rights are to be taken to be acquired and to be preserved. A civilization based upon rights must necessarily come to fight. In such a society the Instincts of acquiring hoarding and maintaining ultimately upset peace. On the other hand a culture build upon duties recognizes the right to do one duty as a fundamental privilege in life. A generation that understands such culture gets trained to demand of life ample chances to fulfill its duties. Duty th[illegible]e fore develops the spirit of giving .





# धन्यवाद !



21/01/2020 DR. VASUDHA VINOD DEO